पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक १३

**सभावृत्तांत**

दिनांक - ०४/१२/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०४/१२/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. काळे विमल रमेश
५) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४) शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ नवीन १४ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेस मा.क्रीडा समिती सभेची प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

विषय क्र.५) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात होणा-या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत... मा.उल्हास शेट्टी, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महापौर चषक जिल्हास्तर वेटलिफ्टिंग स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. मा.उल्हास शेट्टी, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत..मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) सन २०१३-१४ मध्ये महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत... मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.क्रीडा समिती सभेमार्फत मा.स्थायी समिती सभेची मान्यता देणेबाबत... मा.विमल काळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे

अनुमोदक : मा.उल्हास शेट्टी

शुक्रवार दिनांक ०६/१२/२०१३ दुपारी ४.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** – शुक्रवार दिनांक ०६/१२/२०१३ दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक १३

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०४/१२/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - ०६/१२/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समिती दिनांक ०४/१२/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०६/१२/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा. उल्हास शेट्टी
५) मा. भारती फरांदे
६) मा. प्रसाद शेट्टी
७) मा. काळे विमल रमेश
८) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – १
दिनांक – ०६/१२/२०१३
सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ – मा. वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

विषय - प्रभाग क्र.११ से.नं.२२ राजनगर मधील कै.मधुकर पवळे व्यायामशाळा जयभवानी तरुण मंडळास चालविण्यास देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६ | विषय क्रमांक – २

दिनांक – ०६/१२/२०१३ | विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा. धनंजय आल्हाट | अनुमोदक – मा.भारती फरांदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/४५/२०१३, दि.१९/११/२०१३

विषय - मनपा खेळाडू दत्तक योजने अंतर्गत क्रीडा साहित्य व क्रीडा गणवेश खरेदी करणेस व खरेदी कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागाकडून करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५७ | विषय क्रमांक – ३

दिनांक – ०६/१२/२०१३ | विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा. उल्हास शेट्टी | अनुमोदक – मा.वसंत लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७९/२०१३, दि.२५/११/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व साई संस्कार संस्था यांच्या सहकार्याने माहे डिसेंबर २०१३ या काळात श्री स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुलेनगर, चिंचवड येथे अपंग तसेच मानसिक अपंग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये ४,४५,९००/- चे खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने विद्युत, स्पिकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग अ प्रभाग व स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च हा स्थापत्य विभाग अ प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,९५,९००/- हा खर्च क्रीडा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५८ | विषय क्रमांक – ४

दिनांक – ०६/१२/२०१३ | विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा. उल्हास शेट्टी | अनुमोदक – मा.वसंत लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/८७/२०१३, दि.०३/१२/२०१३

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.जिक्रअ/शा.क्री.स्प./बैठक/२०१३-१४ दिनांक १३/११/२०१३ च्या पत्रानुसार आयोजित करावयाच्या १४ खेळ प्रकारांच्या स्पर्धांचा खर्च संबंधित खेळ संघटना करणार असल्याचे क्रीडा अधिकारी यांनी सांगितले आहे. त्यामुळे सदर

स्पर्धांसाठी म.न.पा.कडून खर्च करावा लागणार नाही. प्रस्तावात नमुद नव्याने समाविष्ट केलेल्या १४ खेळ प्रकारांच्या शालेय क्रीडास्पर्धा आयोजित करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०६/१२/२०१३

सूचक – मा. उल्हास शेट्टी अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ – मा.उल्हास शेट्टी, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात होणा-या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा, मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा व कला गिर्यारोहण स्पर्धा अनुषंगाने आवश्यक ट्रॉफीज, मेडल्स, सन्मानचिन्हे, चित्रकला कागद, माहिती पुस्तिका छपाई, विद्यार्थ्यांसाठी खाऊ खरेदी, फ्लेक्स बॅनर छपाई, प्रमाणपत्र छपाई, निमंत्रण पत्रिका छपाई, क्रीडा साहित्य इ. ची खरेदी आवश्यकतेप्रमाणे कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६० विषय क्रमांक – ६

दिनांक – ०६/१२/२०१३

सूचक – मा. उल्हास शेट्टी अनुमोदक – मा.भारती फरांदे

संदर्भ – मा.उल्हास शेट्टी, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा वेटलिफ्टिंग संघटना यांचे मान्यतेने वॉर्ड क्र.५७, पिंपळे गुरव येथे माहे जानेवारी/फेब्रुवारी २०१४ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर वेटलिफ्टिंग स्पर्धा २०१४ आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे अंदाजे र.रु.२,१५,५२०/- या खर्चास मान्यता व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था र.रु.२५,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग, संबंधीत प्रभाग व विद्युत स्पिकर व माईक व्यवस्था र.रु.१५,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधीत प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१,७५,५२०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६१ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०६/१२/२०१३

सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा जलतरण असोशिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोशिएशन, पिंपरी यांचे सहकार्याने मोहननगर जलतरण तलाव चिंचवड येथे माहे जानेवारी २०१४ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस अंदाजे र.रु.३,७२,८८०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चातील स्टेज मंडप, टेबल खुर्च्या हा स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत स्पिकर व माईक व्यवस्था हा विद्युत विषयक खर्च र.रु.५०,०००/- संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.२,७२,८८०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६२ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०६/१२/२०१३

सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

प्रस्तावात नमुद प्रमाणे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महापौर चषक ११ विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६३ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०६/१२/२०१३

सूचक – मा. विमल काळे अनुमोदक – मा.भारती फरांदे

संदर्भ – मा.विमल काळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, व पिंपरी चिंचवड महानगर चेस असोशिएशन, चिंचवड पुणे यांचे सहकार्याने माहे डिसेंबर २०१३ अथवा जानेवारी २०१४ या काळात भोसरी येथे महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे अंदाजे र.रु.२,६६,०९०/- चे खर्चास यास मान्यता व या खर्चापैकी स्टेज मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था, हॉल व्यवस्था, टेबल १०० नग खुर्च्या ४०० नग करीता र.रु.५०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर माईक व्यवस्था करीता र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत

विभाग संबंधीत प्रभाग यांचे कडून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१,६६,०९०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ११६० /२०१३
दिनांक – ०७/१२/२०१३



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.